# मेट्रो-३ मार्गावर मान्सूनपूर्व उपाययोजना

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २ : मेट्रो-३ च्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्गावर भुयारी मार्गाची कामे प्रगतिपथावर आहेत. मान्सून काळात या मार्गावर पाणी साचू नये याकरिता मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. पालिकेच्या वतीने यापूर्वीच मान्सूनसंबंधीच्या उपाययोजना, सूचना सर्व अभियंते, तसेच कंत्राटदारांना जारी केल्या आहेत. त्यानुसार एमएमआरसीच्या अभियंते आणि कंत्राटदारांनी सर्व साइट्सवर मान्सूनपूर्व कामे सुरू केली आहेत.

पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी पर्जन्य जलवाहिन्या स्वच्छ करणे, त्यातील गाळ काढून टाकणे, तसेच कॅच पिट्स बांधणे अशी कामे प्रगतिपथावर आहेत. या शिवाय पावसाळ्यात वाहतुकीमध्ये अडथळा येऊ नये याकरिता सर्व बाजूंचे दिशादर्शक, चेतावणी चिन्हे, वाहतूक चिन्हे यांची नव्याने रंगरंगोटी करण्याची कामे सुरू असून, बॅरिकेट्सवर ब्लिंकर्स उपलब्ध केले जातील.

## आपत्कालीन नियंत्रण कक्ष

मेट्रो-३ च्या वतीने पुरापासून बचाव करण्यासाठी पुरेशा प्रमाणात डी-वॉटरिंग पंपांची व्यवस्था करण्यात आली आहे. साधारण १.५ एचपी ते ७५ एचपी क्षमतेचे एकूण ३७१ पंप उपलब्ध केले जातील. एमएमआरसीने मेट्रो-३ मार्गावर पावसाळ्याशी संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी आपत्कालीन नियंत्रण कक्षही स्थापन केला आहे. +९१ ९१३६८०५०६५ आणि +९१ ७५०६७०६४७७ हे हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत.

मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार एमएमआरसी समन्वय साधून मान्सून काळातील कामे करत आहे. मुंबईकरांची कोणतीही गैरसोय होऊ नये, तसेच स्थानकांच्या परिसरात पाणी साचू नये याकरिता अधिकारी तैनात केले जातील. पावसाळ्यात नागरिकांच्या सुरक्षेची संपूर्ण खबरदारी घेतली जाईल.

**- अश्विनी भिडे,** व्यवस्थापकीय संचालक, एमएमआरसी